MHPU180012402016

नि.दि.दा.क्र. १७३/२०१६
विशाल वि. स्मिता व इतर.

## निशाणी २३३ वरील आदेश

[ आदेश दि.२७.०९.२०२३ रोजी ]

प्रस्तुत अर्ज वादीने दावा दुरुस्तीकामी दाखल केलेला आहे. त्यांचे असे कथन आहे की, दावा हा दि. १४.१२.२००० रोजीचे नोटराईझ्ड ताबे साठेखतावरुन केडगांव स्टेशन ग्रामपंचायत मिळकत क्र. १११३ यांसी दक्षिणोत्तर लांबी २४ फुट व रुंदी पुर्व–पश्चिम ११ फुट या दावा मिळकतीचे प्रतिवादी क्र. १ ते १० यांनी वादीस कायम व खुश खरेदीखत करुन नोंदवुन देणेबाबत आणि निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. ताबेसाठेखताच्या दिनांकापासुन दावा मिळकत वादीच्या प्रत्यक्ष ताबेवहिवाटीत होती व आहे.

२. नि. ३२ व ३६ अन्वये प्रतिवादींनी अंडरटेकिंग दिलेले आहे. वर नमुद दावा मिळकतीपैकी वादीच्या ताब्यात असलेल्या दावा जागेपैकी उत्तरेकडील दक्षिणोत्तर ६ फुट व पुर्व–पश्चिम ११ फुट या जागेत प्रतिवादी क्र. ५, २, ३, ४क, ११ ते १३ यांनी अनाधिकाराने घुसून दि. १६.१०.२०२१ रोजी वादीच्या मालकीचे फर्निचर काढुन दावा मिळकतीपैकी वादीच्या ताब्यातील दुकानातील आतील दरवाजास फळ्या मारुन बंद करुन त्यामधील जागेत असलेले वादींचे औषधांचे बॉक्स चोरुन घेऊन गेले. त्याची किंमत रुपये १०,०००/– आहे. तसेच वादींचे दुकानावरील औषधांचा बोर्ड ऑईल पेंटने पुसून टाकला. त्याकरीता वादी यवत पोलीस स्टेशन येथे फिर्याद देण्यास जात असतांना त्यांच्या मोबाईलवर पोलीस हवालदार बाळासाहेब गाडेकर यांचा फोन आला व ते म्हणाले की, तुम्ही मला यवत स्टेशनला भेटायला या, मी पण यवत पोलीस स्टेशन येथे फिर्याद देण्यास आलो आहे. असे सांगितल्यानंतर वादी गाडेकर हवालदार यांना भेटले. सदर वादीस रमेश कुंतीलाल मांडोत, रोहन सुभाष मांडोत, निखिल सुभाष मांडोत, संकेत दिपक मांडोत, अविनाश गणेश गजाकस, गणेश रमेश गजाकस, रमेश जगन्नाथ गजाकस यांनी वादीच्या दुकानातील फर्निचर मोडुन दुकानाचा औषधाचा बोर्ड पुसून वादीचे र.रु. १०,०००/– चे औषधे चोरुन नेलेली आहेत. म्हणुन सदर इसमांच्या विरुध्द फिर्याद द्यावयाची आहे. तेव्हा हवालदार बाळासाहेब गाडे सदर वादीस म्हणाले की, मी केडगांव स्टेशनला येऊन जागा पाहतो. ते त्याठिकाणी आले, पाहणी केली व अविनाश गणेश गजाकस व रमेश मांडोत यांना दावा मिळकतीपैकी वर नमुद मोजमापाच्या जागेत चालु असलेले फर्निचरचे काम बंद करण्यास सांगितले व अनाधिकाराने सदर जागेचा घेतलेला ताबा वादीस देण्यास सांगितले. परंतु त्यांनी वादीचे दावा जागेतील फर्निचरचे काम बंद केलेच नाही व वादीला त्या क्षेत्राचा ताबाही दिला नाही.

३. सदर वादीने मे. पोलीस अधिक्षक साहेब, पुणे येथे दि. २०.१०.२०२१ रोजी तक्रारी अर्ज दिला. तदनंतर त्याकामी वादीचा दि. २२.०४.२०२२ रोजी जबाब झाला. वादीने पोलीस अधिक्षक साहेब यांच्याकडे दि. १४.०७.२०२२ रोजी तक्रार दिली. तथापि

अद्याप सदर वादीस न्याय मिळाला नाही त्यामुळे प्रतिवादींनी गैरमार्गाचा वापर करुन वादीच्या ताब्यात असलेली दक्षिणोत्तर २४ फुट लांब व पुर्व–पश्चिम ११ फुट जागेपैकी अनाधिकाराने दि. १६.१०.२०२१ रोजी रात्री ११.०० वाजले नंतर गैरमार्गाचा अवलंब करुन उत्तरेकडील दक्षिणोत्तर ६ फुट रुंदीचे व पुर्व–पश्चिम ११ फुट लांबीचे दावा मिळकतीचा बेकायदेशीररित्या घेतलेला ताबा मिळणेसाठी सदर वादीस सदरचा दावा दुरुस्त अर्ज करणे भाग पडले आहे. तरी दाव्याच्या सरनाम्यात प्रतिवादी क्र. १० नंतर प्रतिवादी क्र. ११ श्री. अविनाश रमेश गजाकस, वय ३५ वर्षे तदनंतर प्रतिवादी क्र. १२ श्री. गणेश रमेश गजाकस, वय ३७ वर्षे, प्रतिवादी क्र. १३ रमेश जगन्नाथ गजाकस, वय ६२ वर्षे, सर्वांचा धंदा चप्पल दुकान, सर्व राहणार केडगांव स्टेशन, ता. दौंड, जि. पुणे. तसेच दावा परिच्छेद क्र. ८ नंतर ८अ असा आकडा टाकुन दि. १६.१०.२०२१ रोजी रात्री ११.०० वाजल्यानंतर सदर वादींचे ताब्यात असलेल्या दावा मिळकतीपैकी वादीचे परस्पर दक्षिणोत्तर ६ फुट व पुर्व–पश्चिम ११ फुट या मोजमापाचे दावा जागेतील फर्निचर काढुन प्रतिवादी क्र. ५, २, ३, ४क व ११ ते १३ यांनी सदर वादींचे ताब्यात असलेल्या दुकानातील आतील दरवाज्यास फळ्या मारुन बंद केले व अनाधिकाराने सदर जागेचा कब्जा घेतला. सबब सदर वादींनी त्याबाबत वेळोवेळी यवत पोलीस स्टेशन, मे. पोलीस अधिक्षक, पुणे यांना कळवुनही सदर वादीस न्याय मिळाला नाही व त्यांनी अनाधिकाराने सदर वादींचे दावा मिळकतीपैकी उत्तरेकडील जागेत सध्या त्या वेळेपासुन प्रतिवादी क्र. ११ ते १३ त्या जागेत अनाधिकाराने चप्पल व्यवसाय करत आहेत. सबब सदर जागा खुली करुन सदर वादीस सदर जागेचा ताबा मिळणे न्यायाचे व जरुरीचे आहे. त्यामुळे परिच्छेद क्र. ९ मधील मजकुराच्या पुढे व परिच्छेद क्र. १२ब च्या पुढे १२ब१ असा आकडा टाकुन त्यासंदर्भात मजकुर टाकण्यास परवानगी मिळावी व त्यानुसार दावा दुरुस्त करण्याची परवानगी मिळावी अशी विनंती वादीने केलेली आहे.

४. याउलट प्रतिवादींनी नि. २३७ अन्वये सदर अर्जास जोरदार विरोध करुन त्यांचा जबाब दाखल केलेला आहे. त्यांचे असे कथन आहे की, नि. ४० वरील कोर्ट कमिशनर साहेबांच्या रिपोर्टप्रमाणे दावा मिळकतीचे वर्णन १०.४ फुट लांबी बाय १६.७ फुट रुंदी असे आहे. वादीने अर्जात नमुद केलेले मोजमाप चुकीचे दिले आहे. तसेच वादीच्या अर्जातील कथने त्यांनी नाकारली आहेत. तसेच वादीने दुरुस्ती अर्जासोबत दिलेली कागदपत्रे, त्यामधील मजकुर खोटा व बिनबुडाचा आहे या संदर्भात प्रस्तुत प्रतिवादी हे वादीविरुध्द आवश्यक ती कडक कायदेशीर कारवाई करीत आहेत. अर्जास झालेल्या विलंबाची कारणे योग्य व बरोबर नसुन कायद्याने टिकणारी नाही. केवळ या प्रतिवादींना त्रास देण्याच्या व प्रकरण लांबविण्याच्या दुष्ट हेतुने अर्ज दाखल केला असल्याने फेटाळण्यात येणे आवश्यक आहे. तसेच खोट्या आषयाचा अर्ज प्रतिवादींविरुध्द दाखल केलेला आहे. कम्पेन्सेटरी कॉस्ट म्हणुन रुपये १,००,०००/– वादीने प्रतिवादीस देण्याविषयी आदेश होणे आवश्यक आहे. या सर्व कारणास्तव त्यांनी वादीचा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

५. त्यानंतर प्रतिवादी यांनी सदर अर्जावर त्यांचा जादा जबाब लिहुन दिलेला

आहे. त्यांचे असे कथन आहे की, या प्रतिवादींच्या अधिकारास कोणतीही गदा न येता लवकरात लवकर निर्णय/न्यायनिवाडा होण्यासाठी अर्ज मान्य करण्ययास हरकत नाही.

६. वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एस. एन. येळे व प्रतिवादी क्र. १, ४, ५, ६ ते १० यांच्यातर्फे विद्वान विधीज्ञ श्री. विजयराव काळे यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

७. वादीने त्यांच्या कथनाप्रित्यर्थ नि. २३६ यादी लगत मा. पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण दि. २०.१०.२०२१ रोजीचा अर्ज, पोस्टाच्या रिसीट, दि. २७.०४.२०२२ रोजी दिलेला जबाब, पोस्टाची रिसीट, मा. पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण दि. १४.०७.२०२२ रोजीचा अर्ज, पोहोच पावती, पोस्टाच्या पोहोच पावत्या एकुण तीन इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

८. वादीचा अर्ज व प्रतिवादींचा जबाब वाचला. वादीचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि. ४६, जादा सरतपासणीचे प्रतिज्ञापत्र नि. १०५ व १७९ यावर पुढील सरतपासणी दि. १९.०१.२००९ रोजी झाली असुन प्रतिवादींनी वादीचा उलटतपास घेण्यास सुरुवात केलेली आहे. वादीची उलटतपासणी दि. ०२.०२.२०१९, ०२.०३.२०१९, १६.०३.२०१९, ३०.०९.२०१९ तसेच वादीच्या जादा सरतपासणीच्या प्रतिज्ञापत्रावर दि. १७.०८.२०१९, २१.०९.२०१९ रोजी उलटतपासणी सुरु झालेली आहे. परंतु ती अद्यापपर्यंत पुर्ण झालेली नाही. सदर अर्जात नमुद केलेल्या बाबी या दावा प्रलंबित असतांना दि. १६.१०.२०२१, २०.१०.२०२१, २२.०४.२०२२, १४.०७.२०२२ रोजी झालेल्या घडामोडींसंदर्भात आहेत. वादीने सदर घडामोडीसंदर्भात सन २०२१ नंतर दि. १३.०२.२०२३ पावेतो अभिलेखावर आणण्याचे प्रयत्न केल्याचे दिसुन येत नाही. तसेच सन २०२१ ते सन २०२३ पर्यंत वादीने प्रस्तावित दुरुस्ती अभिलेखावर न आणण्याचे किंवा उशीर झाल्याचे कोणतेही स्पष्टीकरण अर्जात नमुद केलेले नाही. याव्यतिरिक्त सदर प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होत नाही किंवा प्रतिवादींच्या हक्कांना बाधा पोहोचणार नाही. तसेच प्रस्तावित दुरुस्ती दाव्यात समाविष्ठ केल्यास दाव्यातील वादाचे निराकरण होणेस मदत होईल. त्यामुळे प्रतिवादींचा जबाब पाहता अर्जात नमुद मजकुर पाहता वादीचा अर्ज हा खर्च लादुन मंजुर होण्यास पात्र ठरतो. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहेः-

## <u>आदेश</u>

१. वादीचा नि.क्र.२३३ चा अर्ज खर्च र.रु. ५००/- (रुपये पाचशे फक्त) प्रतिवादी क्र. १ ते १० यांना पुढील तारखेपर्यंत द्यावा या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

२. वादीने सदर आदेशापासुन १४ दिवसांच्या आत प्रस्तुत अर्जात नमुद केल्याप्रमाणे दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येते. त्या अनुषंगाने वादीने दाव्याची दुरुस्त प्रत दाखल करावी व दावा दुरुस्तीची एक प्रत प्रतिवादींना द्यावी.

३. उपरोक्त आदेश क्र. १ व २ यांची पुर्तता न झाल्यास वादीचा अर्ज नामंजुर झाला असे समजण्यात येईल याची वादी व त्यांचे विद्वान विधीज्ञ यांनी नोंद घ्यावी.

JYOTI BHARAT GOYAL
Digitally signed by JYOTI BHARAT GOYAL
Date: 2023.09.27 15:25:39 +0530

दौंड
दि.२७.०९.२०२३

(**श्रीमती जे.एस.खेडकर–गोयल**)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, दौंड,
ता. दौंड, जि. पुणे.

## CERTIFICATE

"I affirm that the contents of this PDF file of order are same, word to word, as per original order".

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | P. D. Jagatap. |
| Name of the Court | : | Smt. J. S. Khedkar-Goyal,<br>C.J. (J.D.) & JMFC (Court No. 01),<br>Tal. Daund, Dist. Pune. |
| Date | : | 27.09.2023 |
| Order signed by<br>Presiding Officer on | : | 27.09.2023 |
| Order uploaded on | : | 27.09.2023 |

...